**नि.दि.दा.क्र. ३३५/२०११**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**नि.क्र.८७ लगत.**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.१**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | विठ्ठल राजाराम लबडे |
| वय | – | ४२ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

१२. माझी जन्मतारिख २७/०३/१९८२ आहे. माझे शिक्षण इयत्ता ५ वी पर्यंत झाले आहे. माझ्या वडीलांचे मुळ गाव बाभळगाव आहे. बाभळगाव येथे आमची वडीलोपार्जित मिळकत होती. तेथे वडीलोपार्जित मिळकत होती हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केला नाही. टाकळी खंडेश्वरी येथे वडीलोपार्जित मिळकत असल्याबद्दल मी कागदपत्रे दाखल केले आहेत. हे खरे नाही की, वडीलोपार्जित मिळकतीचे कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले नाहीत. अभिलेखावर फेरफारचे उतारे व इतर उतारे दाखल केलेले आहेत. चुलत्याच्या आणि आजोबाच्या नावचे कागदपत्रे दाखल केले आहेत. गट क्र. ९१/९२/३ हा उतारा दाखल केला आहे. सदर उताऱ्यावरील मिळकत ही खरेदीने आलेली आहे. हे खरे नाही की, दि. २६/१२/१९७४ रोजी माझ्या वडीलांनी सर्व्हे क्र. २१२ मधील मिळकत विकत घेतली. सदर मिळकत विकत घेतली त्यावेळी माझा जन्म झाला नव्हता. हे खरे नाही की, सदर जमिन वडीलांनी कशी विकत घेतली याच्याबद्दल मला सांगता येणार नाही. दावा हा आमच्या सांगण्याप्रमाणे वकीलांनी तयार केलेला आहे. हे खरे नाही की, माझी आई व वडीलांनी वादमिळकत एकत्र खरेदी केली असे माझ्या दाव्यात नमुद नाही. हे खरे आहे की, माझ्या दाव्यात नमुद केलेला मजकुर की, 'माझे वडील माझ्या आईला मारहाण

करायचे, छळ करायचे’ हे बरोबर नमुद केले आहे. हे खरे आहे की, माझ्या आईने माझ्यासाठी व माझ्या भावासाठी पोटगी मिळावी म्हणुन वडीलांच्या विरुध्द दावा दाखल केला होता. हे खरे नाही की, दावा दाखल केल्यामुळे माझे आई, वडील मी लहान असल्यापासुन एकत्र राहत नव्हते.

**मध्यान्नाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.02.23 17:45:10 +0530

(आर. बी. राऊत)

दि.२३/०२/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर